| दिनांक 21/03/2025 |
|---|
| 1 पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/06/2024 रोजी 00:00 वा ते दि. 31/07/2024 रोजी 00:00 वा च्या दरम्यान मौजे घोटे आदिवासी वाडी ता.पेण येथे आरोपीत याचे घरात महिला फिर्यादी ही तिची आई आजारी असल्याने तिचे सोबत मामाचे घरी मौजे घोटे येथे गेली असता आरोपीत याने फिर्यादी अल्पवयीन असल्याचे माहित असुन देखील तिचे सोबत शारीरीक लगट करुन फिर्यादि नकार देत असताना तिचे सोबत शारीरीक संबंध करून कोणाला सांगितले तर बघ असा दम देवून त्यानंतर देखील फिर्यादि सोबत शारीरीक संबंध ठेवून फिर्यादि या गरोदर राहील्या<br>याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं.51/2025, बाल लै.अत्या.संरक्षण (POCSO) अधिनियम, 2012 चे कलम 4,6,8, भा.न्या.सं.2023 कलम 64,64 (2)(F), 64 (2)(I),64 (2)(M), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोसइ/श्रीम.अस्मिता पाटील ह्या करीत आहेत. |
| 2. महाड तालुका पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 19/03/2025 रोजी 20:30 वा च्या सुमारास मौजे कावळे हनुमानवाडी येथे श्री.अमोल भास्कर येरुणकर यांचे घरासमोरील अंगणात, ता.महाड येथे फिर्यादी हे साक्षीदार क्र 1 यांचे घराचे अंगणात जेवण बनवीत असताना आरोपीत क्र.01 हा तेथे आला व साक्षीदार क्र 1 यांना बोलला कि या पायरीवर कोणालाही बसु देवु नको त्यावर साक्षीदार क्र 1 बोलले कि या पाय-या कोणच्या आहेत त्या आपण बसुन बोलु असे बालले असता त्यावर तुला भाडण करायचे आहे का असे आरोपीत क्र 1 हा साक्षीदार क्र 1 यांना बोलला असता तेथे आरोपीत क्र 2 हा आला व काही एक कारण नसताना त्यानी फिर्यादी व साक्षीदार क्र 1ते 5 यांना शिवागाळी करुन माझी बंदुक घेवुन या या सर्वांना बघतो असे बालुन दमदाटी करुन घरी गेला व घरातुन हातात बांबुची काठी घेवुन साक्षीदार क्र 1 यांचे अंगणात येवुन फिर्यादी व साक्षीदार क्र 1 ते क्र 5 यांना शिवीगाळ करत त्याचे हातातील बांबुने फिर्यादी याचें उजव्या हातावर उपट टाकुन दुखापत केली त्यानंतर आरोपीत क्र 1 ते 8 असे अंगणात येवुन त्यांनी र्फिर्यादी व साक्षीदार क्र 1 ते क्र 5 यांना शिवीगाळ करीत साक्षीदार क्र 2 यास हाताबुक्याने मारहाण करुन आरोपित क्र 1 यांने अंगणातील जेवण बनविण्याचा पातेले हातात घेवुन साक्षीदार क्र.02 याचे डोक्यात खांदयावर मारुन दुखापत केली तसेच साक्षीदार क्र 5 हीचे डावे हातावर मारुन तिला ढकलले असता ती खालीपडली असता आरोपीत क्र.02,05,06,07,08 यांनी तीची साडी ओडुन फाडली व शिवीगाळ केली त्यानंतर आरोपीत क्र 2 यांने त्यांचे हातातील बांबुने साक्षीदार क्र.03 याचे उजव्या हातावर |

उपट टाकुन दुखापत करुन साक्षीदार क्र.04 हीला देखिल आरोपीत क्र.02 याने ढकलुन खाली पाडुन शिवीगाळ करुन आरोपीत क्र.01 यांने हाताने मारहाण केली असता तेथे हजर असणारी वय-16 वर्षे ही सर्व घटना पाहुन फिट येवुन पडली.

याबाबत महाड तालुका पोलीस ठाणे गुरनं.12/2025, 118 (1),115 (2),352, 351(1), 189(2),(4),191(2),(3) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनी श्री.राजेश जाधव हे करीत आहेत.

3. महाड तालुका पोलीस ठाणे हद्दीत दि. 19/03/2025 रोजी 20:00 वा च्या सुमारास मौजे कावळे हनुमानवाडी येथे, ता.महाड महिला फिर्यादी व साक्षीदार हे घरामध्ये असताना फिर्यादी यांचे घराचे समोरील अंगणात आरोपीत क्र.01 ते 09 सर्व रा.कावळे हनुमानवाडी ता.महाड हे जेवण बनविण्याचा कार्यक्रम करीत होते हे सर्व करीत असताना ते फिर्यादी व साक्षीदार क्र 1 ते क्र 5 यांना चिडवा चिडवीकरीत असताना त्यावेळी फियार्दी यांनी आरोपीत क्र 1 यास विचारले कि हे सर्व काय चालले आहे आणि कशासाठी चालेले आहे या बाबत विचारण केली असता त्या गोष्टीचा राग आरोपीत क्र.01 यास येवुन तो फिर्यादी व साक्षीदार क्र.03 यांचे अंगावर धावुन गेला असता फिर्यादी यांचे हाताला धरून अश्लील शिवीगाळी केली त्यांनतर तेथे साक्षीदार क्र 1,2,व 4 हे आले असता आरोपीत क्र.01 ते 09 याचे सोबत बोला चाली झाली असता आरोपी क्र 2 हा साक्षीदार क्र.05 यांचे अंगावर बांबु घेवुन मारण्यास धावला त्यावेळी फिर्यादी व साक्षीदार यांनी त्याना थांबवीले असता आरोपीत क्र.03 यांनी साक्षीदार क्र.01 यांचे पोटात लाथ मारली आरोपीत क्र.07 याने जेवण तयार करण्याचा पलेता घेवुन साक्षीदार क्र.02 यास मारहाण केली तसेच आरोपीत क्र 4यांनीही जेवण तयार करण्याचा झारा हातात घेवुन साक्षीदार क्र.02 यास मारहाण केली सर्व झटापटीत फिर्यादी तसेच साक्षीदार यांना दुखापती झलेल्या असुन सदरचे भांडण झले नंतर आरोपीत क्र.08 यांनी मी रिटायर पोलीस अधिकारी असुन मी तुम्हाला कायदयामध्ये अडकवीन असे बोलुन धमकि दिली व माझी पोलीस स्टेशन मध्ये चागली ओळख आहे असे बोलले त्यानंतर आरोपीत क्र.01 ते क्र 09 यांनी फिर्यादी व साक्षीदार यांना हाताबुक्यानी मारहाण केली.

याबाबत महाड तालुका पोलीस ठाणे गुरनं.13/2025,296,118 (1),115 (2),352,351(1), 189(2),(4),191(2),(3) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनी श्री.राजेश जाधव हे करीत आहेत.

4. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 19/03/2025 रोजी 08:45 वा च्या सुमारास मौजे- रायगड जिल्हा परिषद शाळा दहीवली, निड,ता.कर्जत येथे जिल्हा परीविक्षा अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे निरीक्षण गृह/बालगृह कर्जत येथील मा.बालकल्याण समिती रायगड यांच्या आदेशाने काळजी व संरक्षणासाठी असलेला बालक वय- 12 वर्षे, त्याचा मित्र 2) वय-12 वर्षे रा.शिरसेगाव ता.कर्जत असे दोंन्ही मुले रायगड जिल्हा परीषद शाळा दहीवली निड ता कर्जत या शाळेत गेली असता दोन्ही बालकांना यांचे अज्ञानपणाचा फायदा घेवुन त्यांना फुस लावुन कोणीतरी अज्ञात

इसमाने त्यांचे अपहरण केले.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.83/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे - 137(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.भागवत हे करीत आहेत.

5. खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/11/2024 रोजी 00:00 वा ते दि.31/12/2024 रोजी 00:00 वा च्या दरम्यान मौजे शिळफाटा खोपोली, खालापुर येथे आरोपीत रा.शिळफाटा खोपोली, ता.खालापूर याने न्यू पटेलनगर शिळफाटा खोपोली येथे सर्व्हे नंबर 18/1 हि जागा आदिवाशींची असुन आरोपीत याने फिर्यादी रा.मिळ एकता कॉलनी, न्यु पटेलनगर, खोपोली ता.खालापुर याला म्हणाला की, येथे रहावयाचे असल्यास पैसे दे नाहीतर तुला येथे राहु देणार नाही असे बोलुन शिविगाळी दमदाटी करुन आरोपीत याने फिर्यादी यांचेकडून रुपये 8,000/- (आठ हजार रोख रक्कम) धमकावून घेऊन व साक्षीदार यास 31,200/- रू गुगलपे करण्यास भाग पाडले असून आरोपीत याने फिर्यादी कडून एकूण 39,200/- (एकोनचाळीस हजार दोनशे रुपये) धमकावून घेतले आहेत. तसेच न्यू पटेलनगर शिळफाटा खोपोली येथील इतर लोकांना देखील धमकावुन पैस घेतले आहेत.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.82/2025, बीएनएस 2023 चे कलम 308(2), 352, 351(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/श्री.ठाकरे हे करीत आहेत.

6. माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 20/03/2025 रोजी 11:00 वा च्या सुमारास मौजे तिनबत्ती नाका जुने माणगाव, मुंबई- गोवा हायवे रोडवर, माणगाव येथे मयत महम्मद रफी इस्माइल जामदार, वय-50, रा.जुने माणगाव हा त्यांचे ताब्यातील पॅशन मोटार सायकल नं एम.एच 06 वाय. 4482 ही स्वत: ढालघर फाटा येथुन माणगांव बाजुकडे चालवित जात असताना, त्यांचे पाठीमागुन येणारा ट्रेलर क्र आर.जे.19 जी.जी. 0570 ही वरील आरोपी चालक याने त्याच्या ताब्यातील ट्रेलर अतिवेगाने, हयगईने, बेदरकारपणे रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवुन मोटार सायकलीस पाठीमागुन ठोकर मारुन अपघात केला. सदर अपघातात मयत यांचे लहान मोठया गंभीर स्वरुपाचे दुखापतीस होवुन त्यात त्याचे मरणास व मोटारसायकलचे नुकसानीस कारणीभुत झाला.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे गुरनं.70/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, भारतीय न्याय संहिता कलम 106,281,125 (a),125(b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.चव्हाण हे करीत आहेत.

7. महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 18/03/2025 रोजी 15:30 वा च्या सुमारास मौजे ईसाने कांबळे गावचे हददीत मुंबई गोवा लेनवर साव़ित्री नदीचे पुलाचे उतारावर ता.महाड येथे आरोपीत रा.राजेवाडी ता.महाड याने त्यांचे ताब्यातील आरोपीत हायवा डंबर एम.एच.06 सी.पी.1060 ही मुंबई बाजुकडुन पोलादपुर बाजुकडे जात असताना भरधाव वेगाने चालवुन रस्त्याचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन त्याचे ताब्यातील हायवा डंबर अचानक डावे बाजुला

वळविल्याने हिरो कंपनीचे शाईन मोटार सायकल क्र.एम.एच.06 सी.ए.8868 ही डंपरच्या पाठीमागील टायरला मोटारसायकल स्वार युवराज राजेश बटावले, वय-19, रा.चोचिंदे वणीकोंड ता.महाड यास गंभीर दुखापतीस तसेच मोटार सायकलचे नुकसानीस कारणीभुत झाला.

याबाबत महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे गुरनं.31/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 184, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 281' 125, A 125B प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/आशिष बोटे करीत आहेत.

8. खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 20/03/2025 रोजी 14:30 वा च्या सुमारास मौजे सोमजाईवाडी खोपोली,ता.खालापुर येथे फिर्यादी यांचे घरासमोर येणेजाणेच्या वहीवटीवर आरोपीत क्र.01 यांनी भिंत बांधली असता सदरची भिंत साक्षीदार क्र.01 व 02 हे पाडत असताना आरोपीत क्र.01 ते 08 तेथे बेकायदेशीर जमाव जमवुन दंगा करुन संगनमताने शिवीगाळी करुन दगडफेक करु लागले त्यावेळी आरोपीत क्र.01 याने फिर्यादी यांचे डोक्यावर विट फेकुन मारुन दुखापत केली तसेच साक्षीदार क्र.01 यास आरोपीत क्र.03 याने विट फेकुन मारुन हाताला दुखापत केली तसेच साक्षीदार क्र.03 व 05 हे सोडवण्यास आले असता आरोपीत क्र 4 हीने लाकडी काठीने उपड मारुन दुखापत केली तसेच साक्षीदार क्र.2 व 6 हे सोडवण्यास आले असता त्यांना दगडफेकीत दुखापत झाली व साक्षीदार क्र.05 हे सोडवण्यास आले असता त्यांना आरोपीत क्र 5,6,7,8 यांनी शिवीगाळी करुन धक्काबुक्की केली.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.83/2025, बीएनएस 2023 चे कलम 189(2), 189(4),191(2),191(3),190,125,118(1),115(2), 351(2), 352 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/शिर्के हे करीत आहेत.

9. गोरेगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/03/2025 रोजी 17:30 वा च्या सुमारास मौजे संदेरी गावचे हदिदत आरोपीत याचे राहते घरी आरोपीत याने अल्पवयीन पिडीत बालीका हिला चॉकलेट देण्याचे बहाण्याने त्याचे राहते घरामध्ये बोलावुन चे सोबत जबरी संभोग केला. सदर गुन्ह्यातील आरोपिस दिनांक 20/03/2025 रोजी 22:50 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत गोरेगाव पोलीस ठाणे गुरनं.19/2025 भा.दं.वि.क.64,64(2)(i)65(2), बाल लै. अत्या.संरक्षण (POCSO) अधिनियम, 2012 चे कलम 4,6 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/श्री.विजय सुर्वे हे करीत आहेत.

10. मांडवा सागरी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 20/03/2025 रोजी 16:30 वा च्या सुमारास मौजे कोळगाव गट नं.339/1 या जागेत, अलिबाग येथे फिर्यादी रा.नरिमन पॉइंट दलामन टॉवर 1317 मुंबई, रा.आडगाव एरंडोल जि.जळगाव, अलिबाग यांना साक्षीदार यांचे मालकीचे कोळगाव येथील गट नं.339/1 या जागेमध्ये साफसफाईचे अधिकार दिलेले असुन साक्षीदार यांचे मालकीचे कोळगाव येथील गट नं.339/1 या जागेमध्ये कोणाचीही परवानगी न घेता बेकायदेशीरीत्या अतिक्रमण करून सदर जागेमध्ये सिक्युरिटी केबीन तसेच मालक साक्षीदार

यांच्या नावाचा बोर्ड व कंपाउन केनच्या साहायाने काढुन बोर्ड केबीन व कंपाउनचे नुकसान केले.

याबाबत मांडवा सागरी पोलीस ठाणे गुरनं.34/2025, भारतीय न्याय दंड संहिता 2023 329(3),351(2),(3),324(4)3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/चेतन म्हात्रे हे करीत आहेत.

11. रोहा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 19/03/2025 रोजी 13:00 वा च्या सुमारास मौजे खालचा मोहल्ला, सिधदार्थ नगर येथील सरकारी रेशन दुकान येथे, ता.रोहा येथे महिला फिर्यादी रा. सिधदार्थ नगर, धावीर रोड बौध्दवाडा, रोहा यांची मुलगी अल्पवयीन वर्ष असल्याचे माहीत असुन सुध्दा तीला आधारकार्ड लिंक करण्याचे कारणाने बोलावुन माबाईलमधील किसींगच्या अश्लील रिल्स दाखवुन हात पकडुन छातीला हात लसवुन विनयभंग केला आहे. सदर बाब पिडीत हिने फिर्यादि यांना सांगितल्याने फिर्यादिया पिडीत हिचेसह आरोपीत यास जाब विचारण्यास गेले असता आरोपीत याने दमदाटी करुन तुमको जो उखाडना है, उखाडलो, अशा अश्लील शब्दात शिवीगाळी केली आहे.

याबाबत रोहा पोलीस ठाणे गुरनं.59/2025, भारतीय न्याय संहिता कलम 74, 75(1), 79, 351 (2), पोक्सो कलम 8,12 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/पायक हे करीत आहेत.

12 पोयनाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 19/03/2025 रोजी 21:15 वा च्या सुमारास मौजे मानकु ळे येथे , अलिबाग फिर्यादी यांची दोन मुले ही त्यांचे ओटीवर पेण फेकणे हा खेळ खेळत असताना त्यातील आरोपीत नं.02 यांचे ओटीवर पडला त्यामुळे आरोपीत नं.01 हा जोरजोरात शिवीगाळी करुन लागल्याने फिर्यादी हया त्याचा जाब विचारण्या करीता गेल्या असता त्या गोष्टीचा आरोपीत नं.01 यांने मनात राग धरुन महिला फिर्यादी यांच्या ओटीवर येवुन फिर्यादी यांचे पती यांना ओटीवरुन खाली खेचुन आरोपीत नं.01 ते 04 यांने संगणमत करुन हाताबुक्याने मारहाण व शिवीगाळ केली तसेच आरोपीत नं. 01 यांने फिर्यादी यांच्या डाव्या पायावर व डाव्या हातावर खाली पडलेली लाकडी रिपने जोरदार झोड मारुन दुखापत केली तसेच फिर्यादी यांचे पायाच्या अंगठाला व उजव्या हाताचे मधल्या बोटास दुखापत केली व आरोपीत नं 01 हा फिर्यादी यांचे पतीचे अंगावर धावुन गेला असता त्यांना रोखण्यासाठी फिर्यादी हया गेल्या असता त्याचे उजव्या हाताचे अंगठाला धारधार लोखंडी वस्तुने मारुन दुखापत केली.

याबाबत पोयनाड पोलीस ठाणे गुरनं.27/2025, भान्यासंहिता कलम118(1),130, 115(2),352,351(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/अमोल घरत हे करीत आहेत.

13. खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 20/03/2025 रोजी 14:30 वा च्या सुमारास मौजे सोमजाईवाडी खोपोली,ता.खालापुर येथे महिला फिर्यादी व त्यांचे कुटूंबिय यांना घराबाहेर आवाज आल्याने ते बाहेर आले असता तेथे 12 आरोपीत हे एकत्र जमुन घरामागील भिंत पाडत होते, त्यावेऴी फिर्यादी यांनी आरोपीत यांना तुम्ही काय करता ? असे वितारले असता त्याचा राग येऊन

आरोपीत यांनी संगणमत करुन शिवीगाळी करुन आरोपीत क्रं.6 यांनी फिर्यादी यांचे दोन्ही हात पकडुन ब्लाऊज व मंगळसुत्र ओढले,व आरोपीत क्रं. 2 हिने फिर्यादीस लाठीने मारहाण केली, तसेच साक्षीदार क्रं.3 हिला आरोपीत क्रं.6,9,12 यांनी धक्कबुक्की करुन तिचे केस ओढुन मारहाण केली व आरोपीत क्रं.5 याने तिचे छातीला हात लावुन तिचे मनात लज्जा उप्तन्न केली. साक्षीदार क्रं.5 हे सोडविण्यास गेले असता आरोपीत क्रं.1,2 व 5 यांनी हाताबुक्काने मारहाण केली व साक्षीदार क्रं.4 हिस आरोपीत क्रं.5 यांनी मारण्याच्या हेतुने हातोडी उगारुन तेथील काठीने मारले.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.84/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 189(2),189(4),191(2),191(3),190, 74,324(2), 118(1) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/कांबळे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 20.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 157 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 1,73,200/-रुपये इतका दंड आकारला आहे.